# वनपरिक्षेत्र अधिकारी कृष्णगिरी उपवन यांचे कार्यालय बोरिवली (पूर्व)

मुंबई - 400066 फोन नं 28847800 Email - kub.sgnp66@gmail.com

## नोटीस

दि. २४/११/२०१६.

सर्व नोंदणीकृत मजुर संस्था, मजुर सहकारी संस्था बेरोजगार संस्था व मजुर पुरवठादार संस्था व खाजगी संस्था यांना कळविण्यात येते की, कृष्णगिरी वनक्षेत्रात विविध कामासाठी दैनंदीन उक्त्या मजुरांची कामासाठी आवश्यकता आहे. मजुर पुरवठा करण्यास तयार असलेल्या संस्थेने त्यांचे अर्ज या कार्यालयास दिनांक १/१२/२०१६ पर्यंत दुपारी ३.०० वाजे पर्यंत मजुर पुरवठा करण्यास तयार असल्याचे विनंती अर्ज दैनंदिन प्रतिदिन मजूरी नमूदसह या कार्यालयास बंद लखोटा मध्ये सादर करावे.

अटी व शर्ती -

१) कामगार आयुक्त यांच्याकडील मंजूर किमान मजूरी दराप्रमाणे मजुर पुरवठा करणे बंधनकारक राहील.
२) कामाच्या आवश्यकतेप्रमाणे मजूर कामावर घेतले जाईल.
३) संस्थेने पुरवठा केलेले मजूर यांची मजूरीची रक्कम संस्थेच्या नावाने धनादेशाद्वारे वितरीत केली जाईल. व संस्थेने मजूरांची मजूरी ही त्यांच्या बँक खातेत RTGS/NEFT/ACPAYEE CHEQUE नेच मजूरी अदा करावी लागेल. व मजूरी वितरीत झालेनंतर संस्थेने त्यांचे बँक स्टेटमेंट या कार्यालयास तात्काळ सादर करणे आवश्यक राहील.
४) कामावर आवश्यकतेप्रमाणे मजूर घेण्याचा व न घेण्याचा संपूर्ण अधिकार या कार्यालयाचा राहील. संबंधित संस्थेचे विनंती अर्ज केव्हांही पुर्व कल्पना न देता काम रद्द केले जाईल.
५) सदरील मजूर पुरवठा कामाबाबत संबंधित संस्थेस कोणतीही कायदेशीर कारवाई करता येणार नाही.

(आर.एम.पवार.)
वनपरिक्षेत्र अधिकारी
कृष्णगिरी उपवन बोरिवली.

प्रति- विभागीय कार्यालय नोटीस बोर्ड.
नियंत्रण कक्ष नोटीस बोर्ड.
कृष्णगिरी वनक्षेत्र कार्यालय.